सत्यमेव जयते

# महाराष्ट्र विधानमंडळ

## सार्वजनिक उपक्रम समिती

## (२०१७-२०१८)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**" महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको)" यांच्या कामकाजासंबंधात महाराष्ट्र शासनाच्या सन २००४-२००५ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील परिच्छेदाच्या आक्षेपासंदर्भात समितीने सभागृहास सादर केलेल्या पंधराव्या अहवालातील शिफारशींवर शासनाने / महामंडळाने केलेल्या कार्यवाहीवरील समितीचा**

# एकविसावा अनुपालन अहवाल

(दिनांक २८/२/ २०१९ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर केला.)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

विधान भवन, मुंबई

# सार्वजनिक उपक्रम समिती

## (२०१७-२०१८)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**“ महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको)” यांच्या कामकाजासंबंधात महाराष्ट्र शासनाच्या सन २००४-२००५ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील परिच्छेदाच्या आक्षेपासंदर्भात समितीने सभागृहास सादर केलेल्या पंधराव्या अहवालातील शिफारशींवर शासनाने / महामंडळाने केलेल्या कार्यवाहीवरील समितीचा**

# एकविसावा अनुपालन अहवाल

(शा.म.मु.) एचबी २४०२–१ (६००-२-२०१९ )

**सार्वजनिक उपक्रम समिति**

**(२०१७-२०१८)**

**समिति प्रमुख**

(१) डॉ. अनिल बोंडे, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. शिवाजीराव कर्डिले, वि.स.स.

(३) श्री. सुरेश हाळवणकर, वि.स.स.

(४) श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.

(५) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.

(६) श्री. अमल महाडीक, वि.स.स.

(७) श्री. संजय ऊर्फ बाळा भेगडे, वि.स.स.

(८) श्री. विजय काळे, वि.स.स.

(९) श्री. द्वारम मल्लिकार्जुन रेड्डी, वि.स.स.

(१०) श्री. सदानंद चव्हाण, वि.स.स.

(११) श्री. हेमंत पाटील, वि.स.स.

(१२) श्री. सुनिल शिंदे, वि.स.स.

(१३) डॉ. राहुल पाटील, वि.स.स.

(१४) श्री. सुनिल केदार, वि.स.स.

(१५) श्री. हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स.

(१६) श्री. अमित झनक, वि.स.स.

(१७) श्री. संदीप नाईक, वि.स.स.

(१८) श्री. हनुमंत डोळस, वि.स.स.

(१९) श्री. भास्कर जाधव, वि.स.स.

(२०) श्री. हितेंद्र ठाकूर, वि.स.स.

(२१) *रिक्त

(२२) श्री. किरण पावसकर, वि.प.स.

(२३) श्री. आनंदराव पाटील, वि.प.स.

(२४) ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

(२५) रिक्त

(२६) श्री. रामराव वडकुते, वि.प.स. (विशेष निमंत्रित)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. जितेंद्र भोळे, सचिव (कार्यभार)

श्री. ना. रा. थिटे, उप सचिव,

श्री. आ. ब. राहाटे, अवर सचिव (समिती),

श्री. आशिष जावळे, कक्ष अधिकारी.

* ॲड. अनिल परब, वि.प.स. यांची दिनांक २७ जुलै २०१८ रोजी विधानपरिषद सदस्यत्वाची मुदत संपुष्टात आल्याने सदर जागा रिक्त आहे.

## अनुक्रमणिका



| अनु क्रमांक (१) | तपशील (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| | **प्रस्तावना** | **(सात)** |
| **एक** | **" महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ " महसुलाचे नुकसान व शालेय भूखंडाचे अनियमित नियतवाटप** (परिच्छेद क्रमांक ४.१.१) | **१** |
| **परिशिष्ट** | **समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त** | **६** |

## प्रस्तावना

मी, सार्वजनिक उपक्रम समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरून " महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ " यांच्या कामकाजासंबंधात महाराष्ट्र शासनाच्या सन २००४-२००५ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील परिच्छेदाच्या आक्षेपासंदर्भात समितीने ९ एप्रिल, २००८ रोजी उभय सभागृहास सादर केलेल्या पंधराव्या अहवालातील शिफारशींवर शासनाने/महामंडळाने केलेल्या कार्यवाहीवरील समितीचा एकविसावा अनुपालन अहवाल सादर करीत आहे.

" महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ " यांच्याकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनावर " महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळाचे " उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, तसेच नगरविकास विभागाचे अधिकारी यांची समितीने दिनांक १९ डिसेंबर, २०१८ रोजी साक्ष नोंदवून घेतली.

महालेखाकार (लेखा III), यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला केलेल्या मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांचे आभार मानते. तसेच " महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळाचे " उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक व नगरविकास विभागाचे अधिकारी यांनी समितीला दिलेल्या संपूर्ण सहकार्याबद्दल समिती त्यांचे आभार मानते.

समितीने मंगळवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९ रोजी झालेल्या बैठकीत या अहवालावर विचार करून तो काही सुधारणांसह संमत केला.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९.

**डॉ. अनिल बोंडे,**
समिती प्रमुख,
सार्वजनिक उपक्रम समिती.

## “ महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) ”

सार्वजनिक उपक्रम समितीने **“ महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ ”** यांच्या कामकाजासंबंधात महाराष्ट्र शासनाच्या सन २००४-२००५ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या वाणिज्यिक अहवालातील परिच्छेदाच्या आक्षेपासंदर्भात समितीने दिनांक ९ एप्रिल, २०१८ रोजी उभय सभागृहास सादर केलेल्या पंधराव्या अहवालातील शिफारशीवर शासनाने/महामंडळाने केलेल्या कार्यवाहीवरील समितीचा हा अनुपालन अहवाल :-

**१.१** सार्वजनिक उपक्रम समितीने सन २००४-०५ च्या पंधराव्या अहवालातील परिच्छेद क्रमांक ४.१.१. मध्ये **“महसुलाचे नुकसान व शालेय भूखंडाचे अनियमित नियतवाटप”** यांचे संबंधात खालीलप्रमाणे अभिप्राय व शिफारस केली होती.

**(अ)** समिती अशी शिफारस करते की, यापुढे शिक्षण संस्थांना भूखंडाचे नियत वाटप करताना पात्रता धारणा करणाऱ्या संस्थांवर अन्याय करण्यात आला आहे व अपात्र असलेल्या संस्थांना अटी शिथील करून भूखंडाचे वाटप करण्यात आले आहे. तसेच या संस्थेला सदर भूखंड सवलतीच्या दराने दिल्याने सिडकोला सुमारे ४५ लाख रुपयांचे नुकसान सोसावे लागले आहे त्याची सदर संस्थांकडून पूर्णपणे वसुली करण्यात यावी. या रक्कमेची वसुली न झाल्यास इमारतीसह सदरहु भूखंड सिडको प्रशासनाने करार रद्द करून ताब्यात घ्यावा. या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्यात यावा.

**१.२** उक्त प्रकरणी विभागाने/महामंडळाने केलेल्या कार्यवाहीबाबत समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनामध्ये महामंडळाने खालीलप्रमाणे खुलासा केला आहे :-

**(अ)** शैक्षणिक संस्थांना भूखंडाचे वाटप करतांना अधिक पारदर्शकता यावी व पात्र संस्थांवर अन्याय होऊ नये म्हणून महामंडळाने दिनांक २६ सप्टेंबर २००७ रोजी केलेल्या ठराव क्र. ९६९६ द्वारे नवी मूल्य आकारणी व वाटप धोरण स्वीकारले असून या धोरणानुसार शैक्षणिक, सामाजिक कारणासाठी असलेले भूखंडाचे वाटप वृत्तपत्रात जाहिरात देऊनच करण्यात येईल. सदर धोरणास शासनमान्यता मिळाली असून त्याची अंमलबजावणी सुरू झाली आहे.

ओरिएंटल एज्युकेशन सोसायटीस शालेय भूखंडाचे वाटप करतांना तेव्हा अस्तित्वात असलेल्या जमीन मूल्य आकारणी धोरणास अधिन राहून संचालक मंडळाच्या मान्यतेनुसार वाटप केले होते. ओरिएंटल एज्युकेशन सोसायटीने शालेय इमारतीचे बांधकाम पूर्ण केले असून शैक्षणिक कार्य सुरू आहे.

समितीची शिफारस लक्षात घेऊन शासन व महामंडळ आवश्यक चर्चेनंतर पुढील कार्यवाही करीत आहेत.

**१.३** उपरोक्त समितीला सादर करण्यात आलेल्या माहितीनुसार सार्वजनिक उपक्रम समितीने सादर केलेल्या पंधराव्या अहवालातील शिफारशीवर शासनाने/महामंडळाने केलेल्या कार्यवाही संबंधात विभागीय सचिवांची व महामंडळाच्या प्रतिनिधींची दिनांक १९ डिसेंबर, २०१८ रोजी साक्ष घेण्यात आली **साक्षीच्या वेळी, महसुलाचे नुकसान व शालेय भूखंडाचे अनियमित वाटप** या विषयाबाबत सद्यःस्थिती काय अशी समितीने विचारणा केली असता उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी समितीस विदित केले की, या संदर्भात ८ कोटी रक्कमेच्या वसुलीच्या नोटीसेस दिलेल्या आहेत. त्यापैकी १.८ करोड रुपये वसूल झालेले आहेत. उर्वरित जी रक्कम आहे, त्याच्यासाठी संबधित संस्थांचे असे म्हणणे आहे की, आम्ही जे मैदान किंवा ओपन स्पेस दिलेली आहे त्या शंभर टक्क्याच्या वर एमआयडीसीची झेड प्राईस होती. त्याप्रमाणे गणना केली पाहिजे. ही खुली जागा असल्यामुळे व यामध्ये बांधकाम नसल्यामुळे संस्थेकडून वसुली करण्यात येऊ नये.

ओरिएंटल एज्युकेशन सोसायटीला हा भूखंड दिल्यानंतर संस्थेला त्याच्यावर लावलेला दंड त्यांनी भरलेला आहे अशी समितीने विचारणा केली असता, त्यावर उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी शाळेसाठी संस्थेने तो दंड भरलेला आहे असे नमूद केले.

समितीने पृच्छा केली की, संस्थेने १.८ करोड रुपयांचा दंड भरलेला आहे. आता संस्थेचे म्हणणे खुल्या मैदानासंदर्भातील आहे. एखाद्या संस्थेला मैदान दिल्यानंतर त्याला एफएसआय देता येत नाही, त्याबाबत सिडकोचे प्रचलित धोरण काय आहे यावर उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की, आपण १०,००० रुपये प्रती वर्ष याप्रमाणे अकरा वर्षासाठी हे लीव्ह ॲण्ड लायसन्स तत्त्वावर दिलेले आहे. १०,००० रुपये भूखंडासाठी निश्चित केलेली रक्कम आहे. एकरकमी स्वरुपात ही रक्कम नियमाप्रमाणे वसूल केली जाते. त्याप्रमाणे नोटीस दिलेली आहे. यामध्ये ओपन स्पेस असल्यामुळे त्याला हा नियम लागू करू नये असे उत्तर सुरुवातीला महामंडळाने दिले होते.

सिडकोकडे दंडाची रक्कम भरून घेतल्यानंतर ते वैध झाले. आता संस्थेला जे मैदान पाहिजे आहे, त्याचा त्यांना एफएसआय मिळणार नाही. परंतु कॉलेजच्या वेळात ते मैदान वापरू शकतील. उर्वरित वेळेत ती सार्वजनिक मालमत्ता आहे. अशा परिस्थितीत जे नियम असतील, त्या नियमाप्रमाणे त्यांना ती सुविधा देणे आवश्यक आहे. असे समितीने मत व्यक्त केले असता, उपाध्यक्ष तथा

व्यवस्थापकीय संचालक यांनी स्पष्ट केले की, संस्थेला भूखंड दिला, त्यावेळी दहा टक्क्यांचे प्रचलित धोरण होते. त्याप्रमाणे साठ वर्षांसाठी भाडे तत्त्वावर दिलेले आहे व त्यावेळी त्यांनी सदर रक्कम भरलेली आहे. परंतु त्यांना शंभर टक्के दंड लावला पाहिजे होता असे लेखा परीक्षकाने आक्षेप घेतला आहे. समितीने पुढे अशी विचारणा केली की, ज्याला एफएसआय देता येत नाही, त्याला शंभर टक्के दंड लावता येणार नाही. लेखा परिक्षकांचा आक्षेप देखील आपल्याला न्याय देण्यासाठीच असतो. जर एफएसआय द्यायचा असेल तर शंभर टक्के दंड लावला असता मोकळ्या मैदानासाठी प्रचलित धोरणानुसार किती पैसे भरावे लागतात त्यावर उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले की, त्यावेळी सुरुवातीला धोरणाप्रमाणे वसुली केली होती. यावर लेखापरीक्षक यांनी The objection regarding loss of revenue is considering that the plot would have been allotted as such. Now, the thing is that the plot is being used as a playground. अशी पृच्छा केली असता उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी नमूद केले की, रुपये ४.४१ कोटी किंमतीच्या भूखंड आरक्षित किंमतीच्या १० टक्के या दराने भूखंड नियत वाटपाची पात्रता निकष पूर्ण करीत नसलेल्या ओईएस या कंपनीला नियत वाटप करण्यात आला आहे. त्यामुळे परिणाम स्वरुप अपात्र संस्थेला रुपये ३.९८ कोटीचा अदेय फायदा होणार आहे. As per our prevalent policy it was only 10%. Now, A.G. pointed out about the ineligibility of the said institution, and therefore, we should charge them 100% . This is how notice of Rs. 3.97 crore was served on them. However, as part of that the said institution has was served on them. However, as part of that the said institution has paid for the school plot. Now, hon'ble Committee is saying about the remaining plot that, A.G. should accept that it should not be applicable to ground. समितीने पुढे नमूद केले की, त्यांनी जेथे बांधकाम केलेले आहे, त्याला आपण शंभर टक्के लावत आहात, एजी यांच्या पॅरामध्ये जे काही नुकसान झालेले आहे, ते आपण वसूल करू. परंतु उर्वरित बांधकामास तत्कालीन नियमाप्रमाणे न्याय देण्यात यावा.

समितीने पुढे पृच्छा केली की, संस्थेच्या माध्यमातून तेथे कॉलेज सुरू आहे. याबाबत अधिक माहिती द्यावी. यावर, महामंडळाच्या प्रतिनिधीने नमूद केले की, सानपाडा येथे ओरिएंटल एज्युकेशन सोसायटीला शाळेकरिता वाटप करण्यात आलेल्या भूखंडाला महामंडळाने विरोध केला होता. त्यावेळी शाळेकरिता चार हजार चौरस मीटर इतका भाग होता. त्यापैकी १००० चौ.मी. बी.एड., डी.एड. महाविद्यालयाकरिता, शेजारचा भूखंड शालेय क्रीडा उपक्रमाकरिता वाटपाचा निर्णय झाला

होता. त्याप्रमाणे वाटप केले. संस्थेने कालांतराने त्या भूखंडावर बी.एड., डी.एड. कॉलेज सुरू आहे. फार्मसी कॉलेज आणि मॅनेजमेंट कॉलेज सुरू केलेले आहे. परंतु शालेय उपक्रम सुरू केले नाहीत. सर्व कॉलेज बंद करून तेथे शालेय उपक्रम नियमाप्रमाणे सुरू करण्यात यावेत, अशा नोटीसा दिलेल्या आहेत. संस्थेने या नोटीसवर उत्तरादाखल म्हटले आहे की, संस्थेला भूखंड शाळेकरिता दिलेला आहे, तरीही शंभर टक्के रिझर्व्ह प्राईसने दंड लावलेला आहे. तत्कालीन भूधोरणामध्ये उच्च शिक्षणाकरिता पन्नास टक्क्यांचे धोरण होते. महामंडळाने त्यांच्याकडून उच्च शिक्षणासाठीचा दर पन्नास टक्के असूनही शंभर टक्क्याप्रमाणे रक्कम घेतलेली आहे. महामंडळाने त्यावेळी दुप्पट रक्कम घेतलेली आहे. त्यामुळे संस्थेला उच्च शिक्षण देण्याची परवानगी देण्यात यावी. वाशी सेक्टर बारामध्ये या संस्थेला शाळेकरिता जो भूखंड दिलेला आहे, तेथे त्यांनी शाळाही सुरू केलेली आहे तसेच मॅनेजमेंट कॉलेज सुरू केलेले आहे.

**अभिप्राय व शिफारस :**

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००४-०५ च्या (वाणिज्यिक) अहवालातील परिच्छेद क्रमांक ४.१ व ४.१.१ मध्ये **महसुलाचे नुकसान व शालेय भूखंडाचे अनियमित नियत वाटप** मध्ये अपात्र संस्थांना सवलती ज्या दराने नियत वाटप केल्याने ४९.२४ कोटी रुपये महसुलाचे नुकसान झाले. असा लेखा आक्षेप घेण्यात आला. उक्त लेखा आक्षेपास उत्तर देतांना महामंडळाने खुलासा केला होता की, पात्रतेचे निकष पूर्ण न करणाऱ्या ज्या दोन संस्था आहेत त्यापैकी एक सिडकोच्या तत्कालीन अध्यक्ष व दुसरे सिडकोचे एक संचालक यांच्या होत्या. सानपाडा व वाशी क्षेत्रामधील १५, ५५०. २३ चौ.कि.मी. क्षेत्राचे सहा भूखंड महामंडळाने ओरिएंटल एज्युकेशन सोसायटीस शैक्षणिक संस्था संस्थापित करण्यासाठी नियत वाटप केले होते. तसेच वाशी येथील सेक्टर १२ मधील शाळा भूखंड क्रमांक १४९ आणि त्यास लागून असलेल्या क्रीडांगण भूखंड देण्याचा निर्णय महामंडळाने घेतला. संस्थेने सानपाडा वसाहतीमधील डी.एड./बी.एड. विद्यालयदेखील उभारले आहे. सबंधित संस्था माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षेचे मागील तीन वर्षांतील निकाल ८५ टक्के असल्याचा निष्कर्ष वगळता आर्थिक क्षमता, शिक्षण क्षेत्रातील अनुभव इ. इतर सर्व निकषांची पूर्तता करीत होती. उक्तप्रमाणे सिडकोने सादर केलेली लेखी माहिती व समितीने घेतलेली साक्ष या अनुषंगाने **तत्कालीन समितीने नुकसान झालेली रक्कम वसूल करण्याबाबत व रक्कम वसूल न झाल्यास इमारतीसह सदर भूखंड करार रद्द करून सिडको प्रशासनाने ताब्यात घ्यावा,** अशी शिफारस केली आहे.

उक्त शिफारशीच्या अनुषंगाने महामंडळाने/शासनाने केलेल्या कार्यवाही बाबत विद्यमान समितीने दिनांक १९ डिसेंबर, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीस सिडको महामंडळाने विदित केले की, समितीने केलेल्या शिफारशीप्रमाणे संबंधित संस्थांकडून महामंडळाने ८ कोटी रकमेपैकी संस्थेकडून १.८३ कोटी रक्कम वसूल केलेली आहे. उर्वरित रकमेबाबत संस्थेचे म्हणणे आहे की, मैदानावर एफएसआय मिळत नसल्यामुळे सदर रक्कम वसूल करण्यात येऊ नये. त्याचप्रमाणे शाळेसाठी भूखंड दिलेला असून त्यासाठी महामंडळाने संस्थेस लावलेला १०० टक्के रिझर्व्ह प्राईस दंड संस्थेने भरणा केला आहे. त्यामुळे संस्थेस तेथे उच्च शिक्षण सुरू ठेवण्याची परवानगी देण्यात यावी.

समितीच्या मते, तत्कालीन समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने महामंडळाने संबंधित संस्थेकडून रक्कम वसूल केलेली आहे. तथापि, संस्थेस वाटप केलेल्या खुल्या जागेसाठी लावलेला दंड सदर मैदानावर एफएसआय मिळत नसल्याने वसूल करणे योग्य नाही. तसेच शालेय भूखंडासाठी वाटप केलेल्या भूखंडासाठी संस्थेने १०० टक्के रिझर्व्ह प्राईसने दंड भरणा केलेली आहे.

**सबब, समिती शिफारस करते की, महामंडळाने तत्कालीन समितीने केलेल्या शिफारशीचे अनुपालन केले असून संस्थेस वाटप केलेल्या क्रीडांगणाच्या जागेवर अथवा मैदानावर कोणत्याही स्वरूपाचे बांधकाम करता येत नसल्याकारणाने एफएसआय मिळू शकत नाही. त्यामुळे सदर मैदानासाठी संबंधित संस्थास कोणत्याही स्वरूपाचा दंड लावण्यात येऊ नये. त्याचप्रमाणे ओरिएंटल एज्युकेशन सोसायटीस शाळा सुरू करण्यासाठी वाटप केलेल्या भूखंडावर संस्थेने महाविद्यालय सुरू केल्यामुळे महामंडळाने संस्थेकडून १०० टक्के रिझर्व्ह प्राईसने दंड लावलेला असून संस्थेनेदेखील भरणा केली आहे. महामंडळाच्या धोरणानुसार ५० टक्के रिझर्व्ह प्राईज भरणा करून त्यावेळी कोणत्याही संस्थेस महाविद्यालय सुरू करता येत असूनदेखील ओरिएंटल एज्युकेशन संस्थेने १०० टक्के रिझर्व्ह प्राईजने म्हणजे दुप्पट रक्कम भरणा केलेली असल्यामुळे संस्थेस महाविद्यालय सुरू करण्याची परवानगी देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

समितीने केलेल्या उक्त शिफारशींच्या अनुषंगाने महामंडळाने/शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस दोन महिन्यांत अवगत करावी, अशीही समितीची शिफारस आहे.

## परिशिष्ट

## समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

### पहिली बैठक

सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक बुधवार, दिनांक १९ डिसेंबर २०१८ रोजी दुपारी २-०० वाजता, कक्ष क्रमांक ८०१, आठवा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते :—

**उपस्थिती :**

(१) डॉ. अनिल बोंडे, वि.स.स., तथा समिती प्रमुख

(२) श्री. अमित झनक, वि.स.स.

(३) श्री. संदीप नाईक, वि.स.स.

(४) श्री. हनुमंत डोळस, वि.स.स.

(५) ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. ना. रा. थिटे, उप सचिव,

(२) श्री. आशिष जावळे, कक्ष अधिकारी.

**महालेखाकार कार्यालय :**

श्री. मधुसुदन नायर, उप महालेखाकार.

**विभागीय प्रतिनिधी :**

(१) श्री. लोकश चंद्र, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ,

(२) श्री. श्रीराम यादव, उप सचिव, नगरविकास विभाग,

(३) श्री. लक्ष्मीकांत डावरे, पणन व्यवस्थापक, महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ,

(४) श्री. प्रमोद जाधव, एस.एस.ओ. महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ.

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००४-२००५ च्या वाणिज्यिक अहवालातील " महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक चार मधील परिच्छेद ४.१.१ यावरील समितीच्या पंधराव्या अहवालातील शिफारशींवर केलेल्या कार्यवाहीसंदर्भात महामंडळाच्या प्रतिनिधींची तसेच विभागीय अधिकाऱ्यांची साक्ष घेतली.

## दुसरी बैठक

सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक मंगळवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९ रोजी दुपारी ३-०० वाजता, कक्ष क्रमांक १९०१, एकोणिसावा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते :—

### उपस्थिती :

(१) डॉ. अनिल बोंडे, वि.स.स., तथा समिती प्रमुख

(२) श्री. अमल महाडीक, वि.स.स.

(३) श्री. सुनिल शिंदे, वि.स.स.

(४) श्री. सुनिल केदार, वि.स.स.

(५) श्री. हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स.

(६) श्री. संदीप नाईक, वि.स.स.

(७) श्री. आनंदराव पाटील, वि.प.स.

(८) ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. ना. रा. थिटे, उप सचिव,

(२) श्री. आ. ब. राहाटे, अवर सचिव (समिती),

(३) श्री. आशिष जावळे, कक्ष अधिकारी.

समितीने प्रारूप अहवालाच्या मसुद्यांवर विचार करून तो काही सुधारणांसह संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई